# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक २६० वा गुरूवार दि.२१ मार्च २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## जाहिरात प्रमाणीकरणासह सोशल मिडीयाच्या वापरावर लक्ष ठेवा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर, दि. २० : भारत निवडणुक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला असून त्या अनुषंगाने जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण आणि संनियंत्रण समिती (एमसीएमसी) कार्यान्वित करण्यात आली आहे. या समितीने इलेक्ट्रॉनिक माध्यमातून प्रसारित होणाऱ्या जाहिरातींच्या पूर्वप्रमाणीकरणासह सोशल मिडीयाच्या वापरावरही लक्ष ठेवण्याच्या सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या.जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक सभागृहात एमसीएमसी समितीच्या बैठकीत श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या. लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, प्र. अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, समितीच्या सदस्य उपविभागीय अधिकारी अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, पोलीस उपाधिक्षक जी. एल. भातलवंडे, सायबर सेलचे पोलीस निरीक्षक दयानंद पाटील,




बीएसएनएलचे उपविभागीय अधिकारी विजयकुमार पाटील, पुरणमल लाहोटी शासकीय तंत्र निकेतनचे व्याख्याता एस. डी. जाधव, धनंजय पवार, विनोद चव्हाण यांची यावेळी उपस्थिती होती. निवडणूक काळात माध्यम प्रमाणीकरण आणि माध्यम सनियंत्रण समितीची भूमिका अत्यंत महत्वाची असून सोशल माध्यमांद्वारे होणाऱ्या प्रचारावरही या समितीने काळजीपूर्वक लक्ष ठेवावे. तसेच या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार आणि अनुषंगिक अधिनियमानुसार कार्यवाही करावी. पेडन्यूज, जाहिरात खर्च याविषयी काटेकोरपणे कार्यवाही करून त्याबाबतचा अहवाल सादर करावा, अशा सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या.समितीचे सदस्य सचिव तथा प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप यांनी समितीची रचना, कार्य आणि जबाबदाऱ्या याविषयी सादरीकरण केले.या जाहिरातींचे पूर्व-प्रमाणीकरण आवश्यक दूरचित्रवाणी वाहिनी, केबल नेटवर्क, केबल वृत्तवाहिन्या, सिनेमा हॉल, रेडिओ, सार्वजनिक तसेच खासगी एफएम चॅनेल्स, सार्वजनिक ठिकाणी दाखविण्याच्या दृक-श्राव्य जाहिराती, ई-वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती, बल्क एसएमएस, रेकॉर्ड केलेले व्हाईस मेसेजेस, सोशल मीडिया, इंटरनेट संकेतस्थळे यावर दर्शविण्याच्या जाहिराती तसेच मतदानाच्या आणि त्याच्या एक दिवस आधी वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातींचे पूर्व-प्रमाणीकरण एमसीएमसी समितीकडून करून घेणे बंधनकारक आहे. खासगी व्यक्ती, उमेदवार यांच्या जाहिरातींचे प्रमाणीकरण जिल्हास्तरीय एमसीएमसी समितीकडून करण्यात येते, तसेच राजकीय पक्ष, संघटना, समूह यांच्या जाहिरातींचे प्रमाणीकरण राज्यस्तरीय समितीमार्फत केले जाते. जाहिरात प्रसारित अथवा प्रसिद्ध करण्याच्या नियोजित दिवसाच्या तीन दिवस अगोदर जिल्हास्तरीय समितीकडे पूर्ण भरलेला विहित नमुन्यातील अर्ज, जाहिरातीची अर्जदाराने स्वाक्षरीत केलेली दोन प्रतीतील मुद्रित स्क्रिप्ट, जाहिरातीच्या दोन सीडी समितीकडे सादर करणे बंधनकारक आहे.

## लातूर ग्रामीण विधानसभा भाजपा भटक्या विमुक्त आघाडी संयोजक पदी श्याम भोळे

लातूर :- भारतीय जनता पार्टीच्या भटक्या विमुक्त आघाडी लातूर ग्रामीण विधानसभा संयोजक पदी लातूर तालुक्यातील मौजे कानडी बोरगाव येथील श्याम नामदेव भोळे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांना भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील गावागावात वाडी वस्तीत प्रत्येक बूथ स्तरावर भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वाखाली भाजपा पक्षाचे मजबूत संघटन करण्यात येत आहे. पक्षाच्या विविध आघाडी आणि मोर्चाची सक्षम कार्यकारिणी कार्यरत असून लातूर ग्रामीण विधानसभा भटक्या विमुक्त आघाडीच्या संयोजक पदी श्याम नामदेव भोळे यांची नियुक्ती करून आ. रमेशअप्पा कराड यांनी शासनाच्या विविध योजनेचा भटक्या विमुक्तांना लाभ द्यावा त्याचबरोबर मतदार संघात या आघाडीची मजबूत बांधणी करावी अशा शुभेच्छा दिल्या.



लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात झालेल्या या नियुक्तीपत्र प्रदान कार्यक्रमास भाजपाचे शाम वाघमारे यांच्यासह भटक्या विमुक्त समाजातील भारत भोळे, अभिमन्यू हारगावकर, श्याम मंडकर, सतीश कारे, अमित शिंदे, आकाश काळे, भरत चौगुले, गोविंद राठोड, माऊली आरमाने, विलास कदम, रामदास मंडगर, गोविंद क्षिरसागर, अशोक कांदे, विकास मंडकर, अजय भोळे, शिवाजी घावीट यांच्यासह अनेक गावातील तरुण मोठ्या संख्येने होते.

# नेहमीच रुग्णसेवेत व्यस्त असणाऱ्या डॉक्टरांचे कलाविष्कार थक्क करणारे!- वैशालीताई विलासराव देशमुख.

## इंडियन मेडिकल असोसिएशन, लातूरचा सांस्कृतिक महोत्सव जल्लोषात साजरा

लातूर :- इंडियन मेडिकल असोसिएशन, लातूर व वुमेन्स डॉक्टर्स विंग चा सांस्कृतिक महोत्सव दिनांक १७ मार्च, २०२४, रविवारी दयानंद सभागृह येथे जल्लोषात साजरा करण्यात आला. ह्या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून विलास सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षा वैशालीताई विलासराव देशमुख यांची उपस्थिती होती. सदस्य डॉक्टरांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा व व्यस्त दिनचर्येमधून वेळ काढून कुटुंबीयांसोबत मनोरंजन व कलाविष्काराचा आस्वाद घेता यावा ह्यासाठी इंडियन मेडिकल असोसिएशन, लातूर तर्फे दरवर्षी सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

कार्यक्रमाची सुरुवात कथक नृत्यांगना श्वेता तंत्रे व त्यांच्या चमूने सुंदर अशा गणेश वंदनेने करून सर्वांना मंत्रमुग्ध करून टाकले. अनेक डॉक्टरांनी ह्या प्रसंगी आपल्या गीतगायन आणि नृत्य या कलाविष्कारांचे सादरीकरण केले. उद्घाटन कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या दीप प्रज्वलन व धन्वंतरी प्रतिमेचे पूजन करून झाली. याप्रसंगी आयएमए लातूरचे अध्यक्ष डॉ. अनिल राठी यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली आयएमए लातूरने वर्षभर केलेल्या कामाचा आढावा घेतला. वर्षभरात इंडियन मेडिकल असोसिएशन, लातूर शाखेने अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवले जसे की; वेगवेगळ्या महत्त्वाच्या दिवशी रॅली ज्यामध्ये सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या तंबाखू मुक्ती, व्यसनमुक्ती, मानसिक आरोग्य, महिला दिवस, आरोग्य दिवस, आत्महत्या प्रतिबंध, अस्थमा ह्या विषयांवर रांगोळी, पोस्टर अशा विविध माध्यमांद्वारे जनजागृती करण्यात आली. मधुमेहावर बोलू काही व हृदयरोग कसा टाळावा? यावर तज्ज्ञांबरोबर जनसंवाद कार्यक्रम देखील घेण्यात आले. ह्या उपक्रमाचा हजारो रुग्णांनी लाभ घेतला. लोकनेते स्वर्गीय विलासरावजी देशमुख यांच्या पुण्यतिथीनिमित्त सुमारे २२५ रुग्णालयांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य शिबिरांमध्ये २०००० पेक्षा जास्त रुग्णांनी तपासणी करून घेतली. मिशन पिंक हेल्थ च्या माध्यमातून १५ शैक्षणिक संस्थांमधील ३५०० पेक्षा जास्त शाळकरी मुली, त्यांच्या माता व शिक्षिका यांच्यामध्ये मासिक पाळी, सोशल मीडिया चा सुरक्षित वापर, शारीरिक व मानसिक आरोग्य याबद्दल समुपदेशन शिबिरे घेण्यात आली. आयएमए च्या 'आओ गाव चले' मोहिमेअंतर्गत ग्रामीण भागात आरोग्य शिबिरे व समुपदेशन शिबिरे आयोजित करण्यात आली. वाहतूक नियंत्रण पोलीस शाखा यांच्या सहयोगाने पोलीस कर्मचारी, ऑटो रिक्षा, टॅक्सी व बस चालकांसाठी आरोग्य शिबिर घेण्यात आले. ह्या शिबिरात व डॉक्टर्स डे च्या निमित्ताने रक्तदान शिबिर आयोजित करून १५० पेक्षा जास्त रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात आले. संघटनेच्या मजबुतीकरणासाठी ७६ नवीन सदस्यांची नोंदणी करण्यात आली. डॉक्टरांच्या व रुग्णालयांच्या दृष्टीने महत्त्वाचे विषय जसे की हॉस्पिटल रजिस्ट्रेशन संबंधित समस्या यासाठी शासकीय अधिकारी व लोकप्रतिनिधी यांच्याशी संपर्क व चर्चा, डॉक्टर व रुग्ण यांच्यातील सुसंवाद वाढवा म्हणून पावले उचलणे तसेच विविध परिषदांमार्फत शैक्षणिक चर्चासत्रे आयोजित करण्यात आली. त्याबद्दल डॉ. अनिल राठी ह्यांनी विस्तृत माहिती दिली.

आयएमए लातूरचे सचिव डॉ. आशिष चेपुरे यांनी मागील वर्षातील संघटनेच्या महत्त्वाच्या उपलब्धींची माहिती दिली. इंडियन मेडिकल असोसिएशन लातूर तर्फे आयोजित जागतिक योग दिवस व जागतिक सायकल दिवस ह्या आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांना भरघोस प्रतिसाद लाभला. ३ मार्च रोजी झालेल्या आयएमएथॉन लातूर २०२४ ह्या मॅरेथॉन स्पर्धेत १५०० पेक्षा जास्त धावपटूंचा सहभाग नोंदविला गेला. महिला सक्षमीकरण, समानता व सर्वांसाठी आरोग्य ह्या थीमला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. वर्षभरात डॉक्टर व त्यांच्या कुटुंबीयांसाठी डॉक्टर्स क्रिकेट लीग, इनडोअर स्पोर्ट्स फेस्टिवल ज्यामध्ये कॅरम, चेस, टेबल टेनिस, बॅडमिंटन, जलतरण इत्यादींच्या स्पर्धा घेऊन बक्षिसे देऊन सहभागींना प्रोत्साहित करण्यात आले. डॉक्टरांच्या कलागुणांना प्लॅटफॉर्म मिळावा यासाठी ड्रॉईंग स्पर्धा, रांगोळी कॉम्पिटिशन, फोटोग्राफी व पोस्टर कॉम्पिटिशन सुद्धा घेण्यात आले. अशाप्रकारे इंडियन मेडिकल असोसिएशन, लातूर शाखेतर्फे सदस्य डॉक्टरांच्या सर्वांगीण विकासासाठी वर्षभर विविध उपक्रम राबवण्यात आले असे डॉ. आशिष चेपुरे ह्यांनी उपस्थितांना सांगितले.

प्रोजेक्ट चेअरमन व उपाध्यक्ष डॉ. अशोक पोद्दार यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यामागची भूमिका विशद केली. वुमन्स डॉक्टर विंगच्या अध्यक्षा डॉ. प्रीती बादाडे व सचिव डॉ. प्रियंका राठोड यांनी त्यांच्या विंगद्वारे घेण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती दिली. प्रमुख पाहुण्या वैशालीताई विलासराव देशमुख यांनी सतत समाजोपयोगी उपक्रम राबवल्याबद्दल इंडियन मेडिकल असोसिएशन, लातूर शाखेचे अभिनंदन केले व डॉक्टरांच्या व्यस्त आयुष्यातून वेळ काढून त्यांचे कलागुण जोपासण्यासाठी सांस्कृतिक महोत्सव आयोजित केल्याबद्दल इंडियन मेडिकल असोसिएशन, लातूरच्या पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले. लातूरकर हे कला, क्रीडा, शिक्षण, आरोग्य या सर्वच क्षेत्रांमध्ये नेहमीच अग्रेसर असतात आणि याचा मला अभिमान वाटतो असेदेखील त्यांनी आवर्जून नमूद केले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कोषाध्यक्ष डॉ. अर्जुन मंदाडे यांनी केले. याप्रसंगी उपसंचालक आरोग्य सेवा डॉ. अर्चना भोसले-किर्दक, आयएमए लातूरचे नियोजित अध्यक्ष डॉ. उमेश कानडे यांची देखील उपस्थिती होती. इंडियन मेडिकल असोसिएशन लातूरचा सांस्कृतिक महोत्सव यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष डॉ. अनिल राठी, उपाध्यक्ष व प्रोजेक्ट चेअरमन डॉ. अशोक पोद्दार, सचिव डॉ.




आशिष चेपुरे, डॉ. अर्जुन मंदाडे, वुमन्स विंगच्या डॉ. प्रीती बादाडे व डॉ. प्रियंका राठोड व आयएमए लातूरची सांस्कृतिक समिती यांनी परिश्रम घेतले.

आयएमएच्या राज्यस्तरीय कलादर्पण महोत्सवांमध्ये पारितोषिके मिळविलेल्या आयएमए लातूरच्या सदस्यांचा याप्रसंगी प्रमुख पाहुणे वैशालीताई देशमुख यांच्या हस्ते सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. आयएमए लातूर व मनियार डायग्नोस्टिक सेंटर, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण देखील ह्या प्रसंगी करण्यात आले. यामध्ये कृष्णा राहुल अभंगे, माही शाम तोष्णीवाल, अद्वय प्रमोद टिके यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिके पटकावली. राज्यस्तरीय पुरस्कारांमध्ये डॉ. अशोक आरदवाड यांना फोटोग्राफीसाठी, डॉ. रामेश्वरी अलाहाबाद यांना चित्रकलेसाठी, तर डॉ. अनघा राजपूत -निबंध स्पर्धा, डॉ. स्वप्ना उटीकर व डॉ. नीलरोहित पैके - गीत गायन, डॉ. निलेश नागरगोजे - कविता व डॉ. मोहिनी गानू व डॉ. राजश्री सावंत यांना नृत्य या प्रकारांमध्ये पारितोषिके मिळाली. तसेच बॅडमिंटन बॅडमिंटन बॅडमिंटन स्पर्धेमधील विजेते डॉ. सुधीर जटाळ व डॉ. प्रशांत कापसे आणि उपविजेते डॉ. गणेश असावा, डॉ. अयाज शेख, डॉ. विष्णुदास खंदाडे यांना देखील ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. तसेच इंडियन मेडिकल असोसिएशन लातूर शाखेचा संपूर्ण राज्यात कलादर्पण महोत्सवांमध्ये सर्वाधिक पारितोषिके मिळवल्याबद्दल सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. प्रमुख पाहुण्या वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या हस्ते अध्यक्ष डॉ. अनिल राठी व सचिव डॉ. आशिष चेपुरे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

ह्या सांस्कृतिक महोत्सवाची थिम भारतीय संस्कृतीच्या विविधतेची झलक अशी निवडण्यात आली होती. गायन प्रकारात एकल गीतांचे सादरीकरण डॉ. स्वप्ना उटीकर, डॉ. अनिता पवार डॉ. श्रीकांत बाहेती, डॉ. पद्मा बियाणी, डॉ. निलरोहित पैके, डॉ. अयाज शेख, डॉ. श्रीनिवास हसनाळे, डॉ. पूनम चिपडे, डॉ. अनुजा कुलकर्णी यांनी करून आपल्या सुमधुर आवाजाने उपस्थितांची मने जिंकली. तसेच डॉ. दत्तात्रय मंदाडे व डॉ. उज्वला कुलकर्णी, डॉ. शिल्पा दडगे व डॉ. किरण होळीकर, डॉ. मनोज पर्बत व डॉ. आनंद गोरे यांनी डुयएट गाण्यांचे उत्कृष्ट सादरीकरण करत प्रेक्षकांना खिळवून ठेवले. नृत्य सादरीकरणामध्ये मल्हारी या गाण्यावर डॉ. मनोज पर्बत, दिल में जगी (बार्बी) गाण्यावर डॉ. राजश्री सावंत, तर डॉ. शिल्पा दडगे यांनी गवळण नृत्य हा आपला कलाविष्कार सादर करून सर्वांची वाहवा मिळवली. ग्रुप डान्स प्रकारामध्ये डॉ. मोहिनी गानु, डॉ. राजश्री सावंत व डॉ. मंजुषा कुलकर्णी यांनी अलबेला सजन आयो रे या गाण्यावर,

ट्रेंडी पंजाबी तडका ग्रुप डान्स मध्ये डॉ. ज्योती सुळ, डॉ. रचना जाजू, डॉ. माधवी तोष्णीवाल, डॉ. शितल सोमानी, काश्मिरी बुमरो नृत्यावर डॉ. अनुजा कुलकर्णी, डॉ. अर्चना कापसे, डॉ. प्रतिभा केंद्रे, डॉ. शैला सोमानी, डॉ. अरुणा कवळास व डॉ. कल्पना किनीकर, तर राजस्थानी गुजराती मॅशअप प्रकाराचा ग्रुप डान्स डॉ. सोनाली गोजमगुंडे, डॉ. दिशा ओव्हाळ, डॉ. केतकी चवंडा, डॉ. शीतल हरणे, तसेच वुमन्स विंग कमिटी चे सदस्य डॉ. प्रीती बादाडे, डॉ. प्रियंका राठोड, डॉ. मोहिनी गानू, डॉ. राजश्री सावंत, डॉ. सुरेखा निलंगेकर, डॉ. वसुधा जाजू, डॉ. सुचित्रा भालचंद्र, डॉ. प्राची पन्हाळे, डॉ. स्नेहल शिवपुजे, डॉ. दीप्ती देशमुख व डॉ. अर्चना कापसे ह्यांनी समुह नृत्य सादर करून भारतीय कला संस्कृतीची झलक दाखविली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. चेतन जाजू, डॉ. स्नेहल शिवपुजे, डॉ. प्रमोद टिके, डॉ. शीतल टिके, डॉ. कल्पना किनीकर, डॉ. मंजुषा कुलकर्णी यांनी केले. ग्राफिक्स डिझाइनिंग ची धुरा डॉ. अपूर्वा चेपुरे, डॉ. रामेश्वर अलाहाबादे , डॉ. आकांक्षा अवस्थी यांनी सांभाळली. मंचावरील व्यवस्थेकडे डॉ. सुनीता पाटील, डॉ. संजीवनी तांदळे व डॉ. मोनिका ढवळे-पाटील यांनी कटाक्षाने लक्ष दिले. कार्यक्रमाची सांगता हॉटेल ब्रिज यांनी प्रायोजित केलेल्या चविष्ट असे भोजनाने झाली, त्याचा सर्व इंडियन मेडिकल असोसिएशन सदस्यांनी आपल्या कुटुंबीयांसोबत मनसोक्त आस्वाद घेतला. डॉक्टरांनी सादर केलेल्या कलाविष्कारांचे दिग्दर्शन व संयोजन कोरियोग्राफर समीर बजाज, आकाश मोहिते, सौरभ हुडगे व संगीतकार व गायक डॉ. सुधीर बनशेळकीकर यांनी केले. इंडियन मेडिकल असोसिएशन, लातूरचा सांस्कृतिक महोत्सव यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष डॉ. अनिल राठी, उपाध्यक्ष व प्रोजेक्ट चेअरमन डॉ. अशोक पोद्दार, सचिव डॉ. आशिष चेपुरे, कोषाध्यक्ष डॉ. अर्जुन मंदाडे, वुमन्स विंगच्या डॉ. प्रीती बादाडे व डॉ. प्रियंका राठोड व आयएमए लातूरची सांस्कृतिक समिती यांनी परिश्रम घेतले.


## संपादकीय....

# पुन्हा पुतीनशाही!

रशियाचे अध्यक्ष म्हणून व्लादिमीर पुतीन हे विक्रमी मताधिक्याने पाचव्यांदा विजयी झाले, यात कोणतेही आश्चर्य नाही. याचे कारण रशियात लोकशाही नसून, पुतीन यांची हुकूमशाही आहे. पुतीन यांनी राष्ट्राध्यक्ष किंवा पंतप्रधान या नात्याने गेली २५ वर्षे रशियाचा कारभार सांभाळला असून, त्यांची कारकीर्द ही दडपशाही आणि युद्धखोरीसाठी कुविख्यात आहे. मुळातच जो काही विरोध आहे, तो पुतीन यांनी दाबून टाकला होता आणि निवडणुका होवोत अथवा न होवोत, कार्यकाळ आणखी सहा वर्षांनी वाढवण्याची तयारीही केली होती. विरोधकांना नेस्तनाबूत करणे, त्यांना गायब करणे अथवा यमसदनास पाठवणे, ही त्यांची रीत! रशियात या प्रकारचे भयाचे वातावरण असतानाही पुतीनशाहीला विरोध करण्याचे आवाहन काही नेत्यांनी केले होते. त्याला प्रतिसाद देत, निवडणुकीच्या शेवटच्या दिवशी रविवारी मतदान केंद्रांबाहेर हजारो सामान्य लोकांनी गर्दी केली होती. अध्यक्षपदी पुन्हा पुतीन विजयी होताच, चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी त्यांचे अभिनंदन केले. जिनपिंग यांचीही एकाधिकारशाही असून, राजवट दीर्घकाळासाठी अबाधित राहील, याची चोख व्यवस्था त्यांनी केली आहे. त्यांना चीनचे तहहयात अध्यक्षपद हवे आहे. पुतीन यांच्या विजयातून रशियन जनतेचे त्यांना असलेले समर्थन दिसून येते. 'भविष्यकाळातही रशियाशी लष्करी संबंध अधिक दृढमूल करण्यास चीन तयार आहे,' असे उद्गार जिनपिंग यांनी काढले आहेत. रशियाने सातत्याने कसा विकास केला आहे, याचे त्यांनी कौतुक केले असून, पुतीन यांच्याबद्दल गौरवोद्गार काढले आहेत. खरे तर गेल्या शुक्रवारपासून रशियात सुरू झालेली तीन दिवसीय निवडणूक म्हणजे एक फार्सच होता. निवडणुकीत पुतीन किंवा रशिया-युक्रेन युद्धावर कोणतीही टीका-टिप्पणी करण्यास परवानगी नव्हती. त्यांचे कट्टर राजकीय प्रतिस्पर्धी ॲलेक्सी नवाल्नी हे अलीकडेच तुरुंगात मरण पावले. त्यांचा खून करण्यात आला, असा संशय आहे. अन्य विरोधक जेलमध्ये सडत आहेत किंवा तडीपार तरी आहेत. नवाल्नींच्या सहकार्यांनी मोठ्या संख्येत पुतीन यांच्या विरोधात मतदान करण्याचे आवाहन केले होते. ७१ वर्षीय पुतीन यांच्यासमोर क्रेमलिनधार्जिण्या पक्षांचे तीन प्रातिनिधिक नेते रिंगणात होते. एकीकडे पुतीन प्रचारात युक्रेनला कसे टाचेखाली आणत आहोत, अशी बढाई मारत असताना, त्यांच्या विरोधकांना युक्रेनबद्दल तोंडातून 'ब-'देखील काढण्यास मज्जाव होता. विरोधात उभे असलेले निकोलाय खारितोनोव्ह हे रशियाच्या कनिष्ठ सभागृहाचे खासदार असून, ते कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य आहेत. त्यांना केवळ ४.७ टक्के मते मिळाली. २००४ मध्येही पुतीन यांच्याविरोधात त्यांचा पराभव झाला होता. अर्थात, कागदोपत्री जरी कम्युनिस्ट पक्ष तेथे विरोधात असला, तरी प्रत्यक्षात तो पुतीन यांच्या 'युनायटेड रशिया' या पक्षास समर्थनच देत असतो. व्लादिस्लाव्ह दावान्कोव्ह हे 'न्यू पीपल पार्टी'चे सदस्य असून, त्यांना या अध्यक्षीय निवडणुकीत ३.६ टक्के मते मिळाली. हा पक्ष चार वर्षांपूर्वीच दावान्कोव्ह यांच्या वडिलांनी स्थापन केला असून, दावान्कोव्ह हे संसदेचे उपाध्यक्ष होते. ते अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते आहेत. आता युक्रेनशी समझोता करायचा झाल्यास, तो रशियाच्या शर्तींवरच झाला पाहिजे, अशी त्यांची आग्रही भूमिका आहे. लिओनिद स्लट्सकी यांना अवघी अडीच टक्के मते पडली. ते 'लिबरल डेमॉक्रॅटिक पार्टी ऑफ रशियाफ'चे उमेदवार होते. संसदेच्या परराष्ट्र व्यवहार समितीचे ते उपाध्यक्ष असून, त्यांचा पक्ष हा अतिरेकी राष्ट्रवादाचा पुरस्कार करणारा आहे. शेजारपाजारचे देश अंकित करून, पुन्हा रशियाचे साम-ज्य प्रस्थापित करावे, तसेच अमेरिका व युरोपऐवजी, मध्य पूर्वेशी मैत्री करावी, असे त्यांच्या पक्षाचे धोरण आहे. लिओनिद यांनी लैंगिक सतावणूक केली, असा आरोप काही वर्षांपूर्वी महिला पत्रकारांनी केला होता. वास्तविक कोणतेही स्वतंत्र व मोकळे वातावरण नसताना, पुतीन यांनी निवडणुका घेण्याचेही कारण नव्हते. त्यांना राष्ट्राध्यक्षपदासाठी ८७ टक्के मते पडली असून, सोव्हिएत साम-ज्य विलय पावल्यानंतर एवढ्या मतांनी निवडून येणारे ते पहिलेच राष्ट्राध्यक्ष होत. त्यांनी रशियाची घटना याआधीच बदलली आहे. त्यामुळे त्यांच्या राजवटीस कोणताही अडसर राहिलेला नाही. आता २०३० मध्ये त्यांनी पुन्हा विजय मिळवल्यास, ते स्टॅलिन यांच्या ३१ वर्षांच्या हुकूमशाही राजवटीचे रेकॉर्ड तोडू शकतील!आपल्याविरुद्ध कोणी उभे राहायचे, हे तेच ठरवतात आणि विरोधी उमेदवाराने विजयासाठी कोणताही प्रयत्न करायचा नाही, हेही ठरलेलेच असते. युक्रेनमध्ये आपण कसे शौर्य गाजवले वगैरे दावे ते करत असले तरी, तेथे चुटकीसरशी विजय मिळेल, हा त्यांचा अंदाज पूर्णतः धुळीस मिळाला. युद्धात शेकडो रशियन सैनिक, तसेच नागरिक मरण पावले. प्रचारात त्यांनी विस्तारवादी धोरणावरच भर दिला होता. सरकारच्या धोरणांना विरोध करणारे पत्रकार, विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्ते यांच्यावर हल्ले करण्यात आले. रशियाविरोधी पाश्चात्त्य राष्ट्रांना धडा शिकवण्यासाठी देशांतर्गत विरोधकांची मुस्कटदाबी करणे, ही देशासाठी आवश्यक गोष्ट असल्याचे चित्र ते रंगवत होते. जे आपले विरोधक आहेत, ते सर्व परकीयांचे एजंट आणि गुन्हेगार आहेत, असे आरोप त्यांनी केले. निवृत्त लष्करी व सनदी अधिकार्यांना पुतीन यांनी पुन्हा भरती करून घेतले. समाजाचे लष्करीकरण करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. रशिया आणि अमेरिकेच्या नेतृत्वाखालील नाटो राष्ट्रांच्या संघटनेत थेट संघर्ष झाल्यास, जग तिसर्या महायुद्धाच्या खाईत जाईल, असा इशारा पुतीन यांनी दिला आहे. तो त्यांच्या विजयानंतर महत्त्वाचा ठरतो. भारताला मात्र रशियाकडून कच्चे तेल, तसेच लष्करी साहित्य मिळते.

# भगवान बुद्ध आनंदी जीवनाचा मार्ग दाता.

बाबासाहेबांनी सशक्त समाज निर्मितीसाठी डॉक्टर , वकील, आणि इंजिनियर्स यांच्याकडे मोठ्या आशेने पाहिले. सुशिक्षितांची एक फौज उभी झाली. पण हातातून शस्त्र टाकलेली फौज निर्माण झाली. बाबासाहेबांना अभिप्रेत असलेल्या संख्येपेक्षा आज समाजात खूप लोक डॉक्टर, वकील आणि इंजिनिअर्स आहेत.पण त्यांनी बाबासाहेबांच्या कार्याची धुरा कधीचीच खांद्यावरून उतरून घेतलीय. त्यामुळे अनेक दंगलीत, अन्याय ,अत्याचारात समाजाला न्याय मिळाला नाही, हे वास्तव आहे. पण हे खरं असलं तरी समाजात काही लोक बाबासाहेबांना अपेक्षित काम करतायत . डॉक्टर के. पी. वासनिक नागपूर जिल्ह्यातील छोट्या गावात त्यांचा जन्म झाला. महाराष्ट्र राज्याच्या कृषी विभागात दहा वर्ष विषय तज्ञ ,तांत्रिक अधिकारी आणि कृषी विकास अधिकारी म्हणून त्यांनी काम केले. १९९५ ते १९१९ पर्यंत त्यांनी कृषी मंत्रालय भारत सरकार नवी दिल्लीमध्ये संयुक्त संचालक आणि अतिरिक्त आयुक्त तसेच भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालय( एम .एच. आर. डी.) अंतर्गत इन्स्टिट्यूट ऑफ ओपन स्कूलींग (एन. आय. ओ .एस. ) मध्ये संचालक अशी महत्त्वपूर्ण पदे भूषविली. पण त्या पदांचा त्यांना कधीही अहंकार वाटला नाही. ते अगदी समाजाशी नाळ जोडून राहिले. त्यांच्या वागण्यात प्रचंड नम्रता आहे. आपण समाजाचे देणे लागतो ही जाणीव त्यांना आहे. ते देणे कोणत्याही मार्गाने शक्य होत असेल तसे प्रत्येकाने समाजाचे ,बाबासाहेबांचे काम करावे. पैसा ,श्रम ,वेळ आणि बौद्धिक रतीब नेहमी देत राहिले पाहिजे असं ते नेहमी बोलतात. निवृत्तीनंतर अनेक लोक मुले नातवंडे इत्यादी सीमित जगात वावरतात .आणि तिथेच संपतात. आपण का जगलो ? कशासाठी जगलो? समाजाला आपण काय दिलं? समाजाने आपल्याला काय दिलं? असे अनेक प्रश्न त्यांना पडत नाहीत .आणि अनेक प्रश्नांची उत्तरे ही सापडत नाहीत. पण डॉक्टर के. पी. वासनिक साहेबांना असे अनेक प्रश्न पडलेत .आणि त्यांची उत्तरही सापडलीत .किमान बाबासाहेबांच्या उपकारांची शक्य तेवढी परतफेड करावी हा विचार डॉक्टर के. पी. वासनिक साहेबांच्या मनात आहे. त्यांच्याशी बोलतांना ते अनेकदा जाणवलं. समाजाचे देणे वासनिक साहेबांनी अनेक प्रकारे फेडण्याचा प्रयत्न केला. भगवान बुद्ध आनंदी जीवनाचा मार्ग दाता या ग्रंथातून त्यांनी समाजाला बुद्ध समजावून सांगितला आहे. बौद्ध धर्मावर अनेक ग्रंथ आहेत. पण डॉक्टर के .पी. वासनिक साहेबांनी केलेली मांडणी मला अतिशय आवडली. भगवान बुद्ध आनंदी जीवनाचा मार्ग दाता हा ग्रंथ त्यांच्या ईीववहर `प हरळिपर्शीी या इंग्रजी ग्रंथाचे मराठी भाषांतर असून हे भाषांतराचे कठीण काम औरंगाबाद येथील प्रसिद्ध साहित्यिक आयु. भीमराव सरवदे यांनी केले. तसेच निवृत्त न्यायाधीश माननीय अनिल वैद्य साहेब यांनी सुरेख प्रस्तावना लिहिलेली आहे. ग्रंथात एकूण तेरा प्रकरणं आहेत. प्रत्येक प्रकरणांचे मुद्देसूद विश्लेषण केले आहे . भाषा अतिशय सोपी आणि प्रसंग समजावून सांगण्याची कला लेखक म्हणून डॉक्टर के. पी. वासनिक साहेबांना चांगलीच अवगत आहे




असं अनेकदा जाणवलं .संपूर्ण ग्रंथात बुद्धाच्या अनेक संकल्पना स्पष्ट करताना तार्किक उदाहरणे देण्याचा वासनिक साहेबांनी प्रयत्न केला आहे. त्या प्रयत्नात ते अनेकदा यशस्वी झाल्याचं वाचक म्हणून माझ्या लक्षात आलं .लेखक प्रकरण १० मध्ये शून्यता हा बौद्ध तत्त्वज्ञानाचा पाया आहे हे आवर्जून सांगतात .बौद्ध तत्त्वज्ञानात वास्तवाचा विचार मध्यवर्ती आहे. कल्पनाविलासापासून बौद्ध तत्त्वज्ञान प्रचंड अंतर राखून आहे. इतर धर्मात आणि बौद्ध धर्मात हाच मूलभूत फरक आहे. माणसाच्या मनाचा इथे सांगोपांग विचार केलेला दिसतो. वासनिक साहेबांनी शून्य वादावर केलेली चर्चा खूप महत्त्वपूर्ण वाटते. आपल्याला जन्मताच त्रास होतो. आणि आपल्याला हवे ते न मिळाल्याने दुःख होते . नको ते मिळाल्याने दुःख होते .वृद्धत्व आल्याने दुःख होते. आजारी पडल्याने दुःख होते .आणि मरणाच्या भीतीने सुद्धा दुःख होते. स्वतःच्या मृत्यूच्या भीतीने प्रचंड दहशत चिंता आणि वेदना होतात. भगवान बुद्ध मृत्यूला मानवाचा सर्वात मोठा धोका आणि दुःख मानतात. चिंतेमुळे अंतहीन नकारात्मक भावना निर्माण होतात. ज्या राग , लोभ,मत्सर, चिंता, नैराश्य ,द्वेष ,अहंकार किंवा दुःखाच्या भीतीचे रूप घेऊ शकतात. जीवन मर्यादित आणि अनित्य आहे, याची आठवण मृत्यू करून देतो. त्यामुळे दैनंदिन जीवनात आपल्यात चैतन्य निर्माण होणाऱ्या ' मी 'आणि 'माझे' ,' स्वतः' इत्यादींसारख्या विचारांना काढून टाकले पाहिजे. शून्यता हे एक असे साधन आहे जे आपल्याला अहंकार केंद्रीत अनुभवापासून वेगळे करू शकते. आणि स्वार्थाच्या तुरुंगापासून मुक्त करू शकते हे जीवनाचे फार मोठे तत्त्वज्ञान आहे. मानवी मनाच्या विविध संकल्पनांचा विचार बौद्ध धर्मात झालेला दिसतो त्यामुळे बौद्ध तत्त्वज्ञान माणसाच्या जगण्याचे संदर्भ देतो .तिथे तंत्र, मंत्र ,पूजापाठ, संत, महंत, आत्मा, परमात्मा, शुभ आणि अशुभ अशा अनेक संकल्पनांना नाकारून भयमुक्त , चिंतामुक्त जीवन जगण्याचे बळ देतो. डॉक्टर के. पी. वसनिक साहेबांनी , भगवान बुद्ध आनंदी जीवनाचा मार्ग दाता हा ग्रंथ लिहून बौद्ध साहित्यात, आंबेडकरी साहित्यात मोलाचे योगदान दिले आहे. संपूर्ण ग्रंथ वाचताना उत्सुकता निर्माण होते .हा ग्रंथ मनाची पकड घेतो. प्रत्येकांकडे हा ग्रंथ संग्रही असावा आणि प्रत्येकांनी वाचावा असाच हा मौलिक ग्रंथ आहे . प्रकाशक आनंद प्रकाशन जयसिंगपूर औरंगाबाद. अक्षर जुळणी सुबक आणि ठळक आहे आकर्षक मुखपृष्ठ आणि दर्जेदार कागद वापरल्याने ग्रंथ आणखी देखणा झाला आहे. एकूण ३०४ पानांचा हा ग्रंथ आहे. लठ्ठ पगाराची नोकरी मिळाली की आपल्यातील अनेक माणसं आपल्याच विश्वात रममान होतात. काही माणसांनाच समाजाची जाणीव असते . त्यातील डॉक्टर के. पी. वासनिक साहेब हे सामाजिक भान जपणारे सच्च्या दिलाचे व्यक्तिमत्व आणि लेखक अशा दुहेरी भूमिकेत मला फार भावलेत. वासनिक साहेबांकडून असेच दर्जेदार साहित्य निर्माण व्हावे यासाठी या ग्रंथाला आणि डॉक्टर के. पी. वासनिक साहेबांना आभाळभर शुभेच्छा.

_ **********

**राजू बोरकर**
**मु .पो. ता. लाखांदूर**
**जिल्हा भंडारा**
**७५ ०७ ० २५ ४ ६७**

# माणसा तू माणूस बन

तुला मानवा या ठायी,जन्म पुन्हा पुन्हा नाही बहुमोलाचे हे लाभले जीवन,माणसा तू माणूस बन तुम्ही म्हणाल माणसाने भरलेल्या या जगात माणसा तू माणूस बन असे म्हणण्याची वेळ का बरे आली असेल. केवळ दिसण्याने माणूस असणे म्हणजे मानव जन्माची सार्थकता सिद्ध होत नाही. मनुष्य जन्म हा ईश्वरनिर्मित सर्व रचनेमध्ये श्रेष्ठ मानला जातो कारण इतर जीवापेक्षा केवळ माणसाला काही बाबतीत श्रेष्ठत्व प्रदान केले गेले आहे. जगातील सर्वच जीव जगत असतात परंतु माणसाला स्वतःचे हित अहित जाणून घेण्याची विशेष समजबुद्धी मिळाली आहे.माणूस जन्माला येतो तेव्हा त्याला कोणत्याही प्रकारचा विकार नसतो कारण त्याचे अंतकरण शुद्ध असते. जन्माला आलेल्या कोऱ्या बाळाला जसे घडवले जाते तसा तो घडत जातो.जन्मतः त्याच्या माथी कसलाही ठप्पा घेऊन येत नाही म्हणून जात,धर्म,पंथ,वंश,चाली रीती यांचा त्याला कसलाही लवलेश नसतो. जसं जसे वय वाढत जाते तस तसे दुनियेत राहून तो दुनियादारी शिकत राहतो.व्यक्तीचा स्वभाव आणि संस्कार हे समाजाची देणं असते कारण शिकवण्या पेक्षा जास्त सभोवताली होणाऱ्या हालचालीतून मिळणारे अनुभव मनावर परिणाम करतात.समाजात राहून त्याच्या जीवनात बदल घडत राहतात.किशोर अवस्थेत आल्यानंतर त्याची समज विकसित होईपर्यंत त्याने खूप काही अनुभवलेल असतं.समाजात वावरत असताना मिळणाऱ्या चांगल्या वाईट अनुभवातून त्याच्या नजरेत निर्माण झालेले चित्र फारच विद्रूप असते.त्याने पाहिलेला माणूस इतरांच्या प्रगतीवर द्वेष करणारा,इतरांच्या सुखामध्ये विरजण घालणारा,आपापसात वाद करणारा,नाते संबंध तोडून एकटा राहण्यात सुख मानणारा,स्वार्थासाठी इतरांना त्रास देणारा आणि इतरांच्या झोळीत दुःख टाकून आनंदी होणारा असाच असतो.

मानव जन्म बहुमोलाचा आहे कारण या जन्मात येऊनच सत्कर्म आणि सदाचार अंगी बाळगून जीवन व्यतीत करणे ईश्वरास अपेक्षित असते परंतु माणूस स्वतच्या विश्वात रमून हित अहित याचा विचार न करता आपल्याच धुंदीत मस्त राहतो.माणसाच्या वृत्ती मध्ये परोपकराची भावना असेल तर या हाताने इतरांना सुख वाटण्याचे पुण्य प्राप्त करता येते.हे सर्व सोडून आपण का असे वेड्या सारखे वागत आहोत?.एखाद्या व्यक्ती कडे इनोव्हा आहे आणि शेजाऱ्याने स्विफ्ट जरी घेतली तरी ईनोव्हा दारात असणारा माणूस दुःखी होतो.माझ्या कडे काय काय आहे याचा मला आनंद नाहीये कारण मी तर इतरांच्या प्रगतीवर उदास होऊन जातो. माणसातील माणुसकी हरवत चालल्याची किती उदाहरणे द्यावीत वैर इर्षेने एखाद्या व्यक्ती बद्दल आयुष्यभर कटुता निर्माण होते तर धन संपत्तीची वाटणी साठी कौटुंबिक नात्यात कायमचा दुरावा निर्माण होतो.जमिनीच्या छोट्याश्या तुकड्यासाठी एकमेकांच्या जीवावर उठणारी माणसं पण समाजात आहेत.लुटमार,खून,दरोडे,जातीय वाद,दंगली अश्या अनेक प्रकारची दुष्कृत्ये होण्या मागे एकच कारण आहे ते म्हणजे मानवमुल्यांचा दिवसेंदिवस होणारा ह्रास.

माणसाच्या श्र्वासाचा क्षणाचा भरोसा नाही.अगदी चालता बोलता या देहातून प्राण निघून जातो.पाण्याचा बुडबुडा असणारा हा मानव जन्म पूर्णत्वास नेण्यासाठी मार्ग शोधण्याची गरज आहे. व्यक्ती हा समाजाचा अविभाज्य घटक आहे म्हणून प्रत्येक माणसाने स्वतःच्या जबाबदारीची जाणीव ठेवून कार्य करण्याला सुरुवात केली तर समृद्ध आणि सक्षम समाज निर्माण होणे सहज शक्य आहे.सभोवताली कुणावर अन्याय होत असेल तर त्या विरुद्ध आवाज उठवणे,निर्बल माणसाला निस्वार्थ आधार देणे,माणुसकीची जाण ठेवून इतरांच्या दुःखात सहभागी होणे यासाठी वेगळ काही करण्याची गरज नाही हे गुण आपल्या अंगी असतातच केवळ ह्या सद्गुनांना चेतना प्रदान करून त्याद्वारे समाजहित जोपासण्याचे कार्य अगदी सहज करता येते. छोट्या छोट्या गोष्टीतून मिळणारा आनंद आपल्या पुरता सीमित न ठेवता त्यात इतरांना सहभागी करून त्यांच्या ओठावर हसू आणता येईल यापेक्षा मोठे पुण्य कशातही नाही.

माणूस आयुष्यभर इतरांमधील दुर्गुण शोधून आपल्या मनात त्याला साठवत राहतो आणि असे करत करत त्याचे अंतर्मन सद्गुण पाहण्याची नजर गमावून बसतो.धन संपत्तीच्या जोरावर माणसाची श्रीमंती ठरवता येत नाही तर त्या श्रीमंतीच्या छायेत दिन दुबळ्याना मायेची सावली मिळाली तरच त्याची श्रेष्ठता.माणसाच्या जन्मात येऊन माणुसकी जोपासली तरच मानव जन्म सफल होऊ शकतो.माणसामधला माणूस जागा करण्यासाठी अनेक संत ,महात्मा,महापुरुष प्रयत्न करत राहिले. सत्संग,सुविचार,सन्मार्ग आणि सदाचार या शिवाय माणूस अपूर्ण आहे याची जाण करून देऊन प्रेम आणि नम्रता मनात भरून माणसाचे जीवन परिपूर्ण करता येते हे त्यांनी वेळोवेळी समजावून सांगितले.केवळ हाडा मासाचा पुतळा बनून जगात मिरवण्या पेक्षा या देहा द्वारे सत्कर्म करत मानवमुल्य जपता आले तरच खऱ्या अर्थाने माणूस आहोत आणि जिवंतही आहोत असे म्हणता येईल. हीच अमुची प्रार्थना, अन् हेच अमुचे मागणे माणसाने माणसाशी,माणसा सम वागणे

*********

पवन श्रीरंगसा कुसुंदल,नांदेड
संपर्क:९०७५५९५६९५

# 'सीएए'मुळे शेजारी देशांतील हिंदू, शिखांचेही भले होणार नाहीच

मोहसीन भट व आशीष यादव केंद्र सरकारने ११ मार्च रोजी नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या - अर्थात 'सीएए'च्या (सिटिझनशिप अमेन्डमेण्ट क्ट) अंमलबजाणीसाठी जे नियम लागू केले, त्यांतून 'सीएए'च्या टीकाकारांचेच म्हणणे योग्य ठरले आहे. मायदेशातील छळामुळे भारतात आश्रय घेऊ पाहणाऱ्या निर्वासितांसाठी मानवतावादी धोरण आखण्याचे सोडून अत्यंत अपारदर्शक आणि निर्वासितांना कायद्याचे संरक्षण न देणारी प्रक्रिया सध्याच्या सत्ताधाऱ्यांनी अमलात आणली आहे. या 'सीएए'नियमांवर तात्त्विक आक्षेप आहेतच, ते भारतीय संविधानाच्या आधाराने घेतले गेले आहेत; कायदा धर्माच्या आधारे भेदभाव कसा काय करू शकतो हा आक्षेप महत्त्वाचाच आहे. '३१ डिसेंबर २०१४ च्या आधी भारतात आलेल्या हिंदू, शीख, बौद्ध, जैन या धर्मांच्या बेकायदा निर्वासितांना इतरांपेक्षा लवकर नागरिकत्व' अशी तथाकथित 'सवलत' देणारा हा कायदा २०१९ मध्ये संमत झाला होता. पण आता आलेल्या त्या विषयीच्या नियमांमधूनही स्पष्ट होते आहे, ते या कायद्याच्या अंमलबजावणी प्रक्रियेवरही याच भेदभावमूलक मानसिकतेचे दिसणारे सावट. त्यामुळे इथे, कायद्याने धर्माआधारे केलेला भेदभाव घटनाबाह्यच ठरणार याची चर्चा थोडी बाजूला ठेवून (आणि सर्वोच्च न्यायालयात ती होईल यावर विश्वास ठेवून), नियमांमधल्या त्रुटी दाखवून देण्याचा या लेखाचा हेतू आहे.ज्यांना ही तथाकथित 'सवलत' दिली जाणार आहे, त्या बिगरमुस्लीम 'लाभार्थी'नादेखील या कायद्याचा लाभ कमी आणि त्रास जास्त होईल, याची खात्रीच हे नियम देतात. आसाममध्ये 'एनआरसी' - नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन्स अर्थात राष्ट्रव्यापी नागरिक-नोंदवहीने जो घोळ घातला, तसाच अंमलबजावणीचा घोळ या 'सीएए'मुळे होणार आहे. कारण 'एनआरसी' काय आणि 'सीएए' काय, निर्वासितांसाठी न्याय्य आणि औचित्यपूर्ण किंवा जबाबदार व्यवस्था तयार करण्याऐवजी दोघांचाही भर निर्वासितांना माणुसकी नाकारण्यावरच दिसतो आहे. 'सीएए'साठी देखील कागदपत्रे आणा, सरकारी बाबूंकडे खेटे घाला, त्यांच्या मर्जीवर अवलंबून राहा, अशीच पद्धत या नियमांतून उघड होते आहे.या नियमांनुसार, 'सीएए'अंतर्गत लाभ मिळवणाऱ्यांना ते अफगाणिस्तान, बांगलादेश किंवा पाकिस्तान यापैकीच एखाद्या देशाचे नागरिक आहेत आणि '३१ डिसेंबर २०१४ ' या तारखेपूर्वीच त्यांनी भारतात प्रवेश केला आहे हे सिद्ध करण्यासाठी एक तरी कागदपत्र प्रदान करणे आवश्यक आहे. दहा वर्षांपूर्वी, तेसुद्धा छळाला वैतागून पळून गेलेल्या अर्जदारांना अशी कागदपत्रे मिळवणे किंवा सादर करणे किती कठीण जाऊ शकते, याची कल्पना खरे तर कुणालाही करता यावी. यापैकी अनेक जणांबाबत तर अशी परिस्थिती असेल की त्यांनी अशी कागदपत्रे गमावली असू शकतात. मूळ देशाचे पारपत्र (पासपोर्ट) असाही उल्लेख ग्राह्य कागदपत्रांच्या यादीत असला तरी 'मुदत संपलेली कागदपत्रे चालणार नाहीत' अशी अटही असल्याने, दहा वर्षांपूर्वीच्या पारपत्राला ती कशी लागू होणार हे कोडेच आहे. अशा सरकारी कोडगेपणाचा जाच मात्र स्थलांतरितांना 'सवलत' मागतेवेळी होणार आहे.ज्यांना मायदेश कधी सोडावा लागलेला नाही त्यांना कल्पना नसेल; पण पाकिस्तान, अफगाणिस्तान यांसारख्या देशांतून भारतात आलेल्या कैक लोकांनी तर एवढ्या काळात आपण 'तिकडचे' ठरवले जायला नको, अशा भीतीपायी स्वत:कडे असलेली तिथली कागदपत्रेही गमावून टाकलेली असू शकतात. तुम्ही इतकी वर्षे 'बेकायदा स्थलांतरित' होतात, हे तर आज भारत सरकारच म्हणू लागले आहे.प्रत्येक वेळी कागदपत्रांची मागणी, हे नोकरशाही असंवेदनशीलतेचे प्रमुख लक्षण. ते आज जगातील अन्य देशांतही निर्वासितांबाबत दिसू लागलेले आहे. स्थलांतर-विषयक तज्ज्ञांच्या मते ऑस्ट्रेलियात हा कागदपत्रांचा जाच, दोषसिद्ध गुन्हेगारांपेक्षाही स्थलांतरित- निर्वासितांना अधिक होतो. अफगाणिस्तानातून ऑस्ट्रेलियात आलेल्यांकडूनही नाना प्रकारची कागदपत्रे मागितली जातात. वास्तविक अफगाणिस्तानात दस्तावेज तयार करण्याची यंत्रणाच कोलमडून पडली होती, हे लक्षात न घेता निव्वळ नोकरशाहीकेंद्री नियम राबवले जातात. कागदपत्रांनाच सर्वस्व मानण्याच्या प्रवृत्तीपायी हा जाच होत असतो आणि त्यातून नोकरशाहीचेच प्रस्थ वाढत असते. कागदपत्रे सादर केल्यानंतर, त्यांचे पुढे काय झाले हे विचारताही येत नाही किंवा कोणाचा निर्णय कुठे आपल्याविरुद्ध गेला हे सांगून कागदपत्रांत सुधारणेची संधी दिली जात नाही, अशा प्रकारे (नागरिकत्वाबद्दलच नव्हे, अन्यत्रही) नोकरशाहीतील अपारदर्शकता वाढत जाते. इथे या 'सीएए' नियमांमध्ये तर 'राज्यस्तरीय सक्षम समिती' आणि 'जिल्हास्तरीय समित्या' अशी रचना आहे. त्यापैकी आपला अर्ज जिल्हा समितीने नामंजूर केला की राज्य समितीने, तो का नामंजूर झाला, हे कळणार नाही कारण राज्यस्तरीय समितीला नकाराचे सर्वाधिकार आहेत.

# समाजभूषण राजू झनके, सामाजिक बांधिलकी आणि समाज भावना जपणारे व्यक्तिमत्व..

काही माणसं कर्तृत्ववाने आणि मनानेही श्रेष्ठ असतात. अशी माणसं आपला मोठेपणा दिसण्यातून नव्हे तर वागण्यातून, कृतीतून आणि कार्यातून दाखवून देत असतात. त्यांना एखाद्या गोष्टीच भांडवल किंवा दिखाऊपणा करुन लोकांची सहानुभूती मिळवता येत नाही असे सामाजिक बांधिलकी आणि समाज भावना जपणारे बंडखोर व्यक्तिमत्व म्हणजे जेष्ठ पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते राजू किसन झनके. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाने त्यांच्या निःस्वार्थी कार्याची दखल घेऊन नुकताच त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने त्यांचा यथोचित असा सन्मान केला आहे. मात्र समाजभूषण पुरस्कार त्यांनी चळवळीतील सक्रिय कार्यकर्त्यांना समर्पित करुन, ज्यांच्या अनमोल संदेशामुळे अभियानाने जन्म घेतला त्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना चैत्यभूमी येथे सहकुटुंब जाऊन पुरस्कार अर्पण केला. तसेच त्यांच्या समाजोपयोगी, उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन अनेक सामाजिक संघटनांच्या माध्यमातून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला असून, अनेक संघटनांची त्यांना पुरस्कारही देऊन सन्मानित केले आहे. एका सर्वसामान्य कुटुंबात राजू झनके यांचा २१ मार्च १९६९ रोजी जन्म झाला. त्यांचे वडील आंबेडकरी चळवळीत सक्रिय होते. कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या भूमीहीन आंदोलनात ते ९ दिवस नागपूर कारागृहात होते. सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले यांनी त्यांच्या वडिलांसह हयात ११ सत्याग्रहींना यशवंतराव चव्हाण सभागृहात पुरस्काराने सन्मानित केले होते. त्यामुळे समाजभूषण राजू झनके यांना चळवळीचे बाळकडू त्यांच्या वडिलांकडूनच मिळाले. वयाच्या १५ व्या वर्षीच ते आंबेडकरी चळवळीत ओढले गेले. पायाखाली जमीन कोणतीही असो, डोक्यावर आकाश कोणतेही असो प्रतिकुल, संघर्षमय परिस्थितीवर मात करुन मोठ्या आत्मविश्वासाने यश संपादन करणे हाच त्यांचा निःस्वार्थी, सर्वसमावेशक, व्यापक दृष्टिकोन त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष देतो. उत्पन्नाचे इतर कोणतेही साधन नसल्याने त्यांनी उपजीविकेसाठी अनेक चांगल्या नोकऱ्या केल्या. पण, चळवळीत सक्रिय सहभाग असल्यामुळे आंदोलने, मोर्चे, बैठका, शासकीय भेटीगाठीमुळे त्यांना एकही नोकरी टिकविता आली नाही. पत्रकारिता, सामाजिक क्षेत्रात कार्यरत राहून त्यांनी अन्याय, अत्याचार, विषमतेच्या विरोधात अनेक यशस्वी लढे देऊन अनेकांना दिलासा, न्याय मिळवून दिला. यांच्या स्वभावातील गोडी, सौजन्यशीलपणा, संकटसमयी धावून जाण्याच्या आंतरिक वृत्तीमुळे चळवळीत त्यांची नेहमीचं संवाद, समन्वय आणि समंजसपणाची भूमिका राहिलेली आहे. पत्रकारिताच नव्हे तर, सामाजिक व राजकीय क्षेत्रातही त्यांची महत्वाची भूमिका आणि योगदामुळे त्यांनी विविध क्षेत्रातील तसेच समाजातील अनेक मंडळींना त्यांना जोडता आले. ड. बाळासाहेब आंबेडकर, डॉ. भीमराव आंबेडकर, आनंदराज आंबेडकर, खासदार रामदास आठवले,



खासदार चंद्रकांत हंडोरे, डॉ. नितीन राऊत, राजकुमार बडोले, प्रा. जोगेंद्र कवाडे, अर्जुन डांगळे, ज.वि. पवार, चंद्रशेखर आझाद, रा. सु. गवई, टी.एम. कांबळे, मनोज संसारे अशा अनेक राजकीय, सामाजिक, साहित्य, शासकीय क्षेत्रातील अनेक दिग्गजांशी त्यांचे निकटचे, मैत्रीचे, जिव्हाळ्याचे दृढ संबंध होते तेवढेच सर्वसामान्य माणसाशीही त्यांचे सलोख्याचे संबंध होते. आपल्या ओळखीचा फायदा त्यांनी सर्वसामान्यांसाठी केला. भीमा कोरेगाव येथील विजयस्तंभाच्या जागेचा विषय, पनवेलमधील अल्पवयीन स्वप्निल सोनावणे याचे प्रेम प्रकरणावरुन झालेले हत्याकांड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तळेगाव दाभाडे येथील बंगल्याच्या डागडुजीसाठी २ कोटींचा निधी, नायर रुग्णालयातील डॉ. पायल तडवी यांची झालेली आत्महत्या अशा अनेक प्रकरणासह अनुसुचित जाती जमातींच्या अनेक समस्यांवर तसेच अन्याय, अत्याचार प्रश्नांवर त्यांनी केलेले काम दुर्लक्षित करता येणार नाही. राज्यातील होतकरु, उपेक्षित आणि आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीचा हातभार देण्यासाठी गेल्या ८ वर्षांपासून ते संस्थापक, अध्यक्ष असलेल्या महामानव प्रतिष्ठानच्या माध्यमातून 'एक वही, एक पेन' हे उपयुक्त अभियान राबवून हजारो विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्याचं फार मोठ काम त्यांनी केल आहे. महापुरुषांची जयंती, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव अशा अनेक उत्सव तसेच मान्यवरांच्या वाढदिवसानिमित्त जनतेने शैक्षणिक साहित्य देण्यासाठी आवाहन व प्रयत्न करण्यात आल्यामुळे 'एक वही, एक पेन' अभियानाची राज्य, देशपातळीवर मोठ्या प्रमाणात दखल घेतली गेली. तसेच गेल्या २३ वर्षापासून मुंबईसह राज्यातील आघाडीच्या अनेक दैनिकांमध्ये त्यांनी पत्रकारिता केली असून, २० वर्षापासून मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र व विदर्भातील आघाडीच्या विविध दैनिकांसाठी मंत्रालय आणि विधीमंडळाचे वार्तांकन केले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील चिंचवली स्मशानभूमी प्रकरणी गावकऱ्यांनी सामाजिक बहिष्कार टाकून, प्रांत अधिकाऱ्यांच्या समक्ष जो जीवघेणा हल्ला झाला त्यावेळी जी काही मान्यवर मंडळी आमच्या पाठीशी उभी राहिली होती त्यात राजू झनके व जेष्ठ पत्रकार संजय बोपेगावकर हे आमच्या पाठीशी ठामपणे उभे राहून संविधानिक सहकार्य केले त्यामुळेच आम्हांला दिलासा मिळाला, सावरता आले होते हे कधीच विसरता येणार नाही. मात्र, आम्ही ज्यांना पुढाकार घेऊन एकत्र आणले त्यांनी चिंचवली स्मशानभूमी प्रकरणी सहकार्य न करता, पाठीशी उभे न राहता आमची नाहक बदनामी करुन आम्हांलाच चळवळीतून उध्वस्त केले. त्या प्रकरणाची सर्व (सदिच्छा भेट ते जीवघेणा हल्ला व त्यानंतरचा घटनाक्रम) तपशील आमच्याकडे पुराव्यासह उपलब्ध आहे. आंबेडकरी चळवळीत नेहमीच सक्रिय आणि अन्याय, अत्याचार प्रकरणी आवाज उठवणाऱ्या समाजभूषण राजू झनके २१ मार्च रोजी आपला ५४ वा वाढदिवस कुर्ला पश्चिम येथील संत गाडगे महाराज वसतीगृहातील उपेक्षित, गरजू मुलांना शैक्षणिक साहित्य व मिठाई वाटप करुन त्यांच्या समवेत साजरा करणार आहेत. अशा सामाजिक बांधिलकी आणि समाज भावना जोपासणाऱ्या प्रेरणादायी, ध्येयवादी आदर्श व्यक्तिमत्वाचे, उपेक्षितांच्या आधारस्तंभाचे भावी जीवन सुख समृद्धीचे, भरभराटीचे, आनंदीमय, यशस्वी, उज्वल, कार्यान्वित, दिशादर्शित, सुरक्षित, इच्छित मनोकामनापुर्तीचे आणि निरोगी आरोग्यमय जावो तसेच ते कार्यरत असलेली सर्व क्षेत्र त्यांच्या कर्तृत्वाने पावन होवोत अशा ५४ व्या वाढदिवसानिमित्त मंगलमय सदिच्छा !

*******

**– मिलिंद कांबळे, चिंचवलकर**
**९८९२४८५३४९**

## कलिंगड, पुदिना, लिंबूचे शक्तिशाली डिटॉक्स ड्रिंक तुमची त्वचा उजळण्यास कशी मदत करते? तज्ज्ञांनी केला खुलासा

उन्हाळा आता जवळ आला आहे. पाणी, ज्युस यांसारखे पेय पिण्यामुळे शरीरातील पाण्याची पातळी राखण्यास मदत होते. अशी पेये तुमची तहान भागवतात, पण यापैकी काही पेय नियमित सेवन केल्याने तुमची त्वचा चमकदार होण्यास मदत होते. कंटेंट क्रिएटर आरती सहानी हिने इन्स्टाग्रामवर असेच एका उन्हाळ्यातील पेयाबाबत सांगितले, ते क्षणार्धात तयार केले जाऊ शकते. व्हिडीओमध्ये सहानी यांनी कलिंगड, पुदिना आणि लिंबू भिजवलेल्या सब्जाच्या बिया आणि मध एकत्र करून एक पेय तयार केले आहे. इन्स्टाग्रामवर व्हिडीओ शेअर करताना सहानी यांनी कॅप्शनमध्ये लिहिले की, हे पेय स्वतःला थंड, हायड्रेटेड, निरोगी आणि त्वचेवर तेज ठेवण्यासाठी तुम्ही दुपारचे जेवण म्हणून घेऊ शकता. ..तर मग आम्ही तुमच्याबरोबर येतो, लोकसभा निवडणुकीआधी उद्धव ठाकरेंचं मोठं वक्तव्य काय आहे डिटॉक्स ड्रिंकची रेसिपी?साहित्य दीड कप – कलिंगड १ टीस्पून – मध २ टीस्पून – भिजवलेले सब्जा बियाणे पाव कप – पुदिन्याची पाने १ चमचा – लिंबाचा रस चवीनुसार गुलाबी/काळे मीठ १ कप – पाणी/नारळ पाणी बर्फाचे तुकडे कृती चिरलेले कलिंगड, पुदिना आणि पाणी किंवा नारळाचे पाणी एकत्र करा.गाळून घ्या एका ग्लासमध्ये भिजवलेल्या सब्जाच्या बिया, बर्फ आणि तयार पेय ओता त्यात ताजे लिंबू पिळून घ्या आणि हवे असल्यास मध घाला. डिटॉक्स ड्रिंकची त्वचा उजळण्यास कसे मदत करते? आता प्रश्न असा पडतो की खरचं हे पेय आपल्या आरोग्यासाठी चांगले आहे का? सहानी यांनी दावा केल्याप्रमाणे या पेयाच्या नियमित सेवनामुळे त्वचा उजळ होईल का? याबाबत द इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना चेंबूर येथील शरीफा स्किन केअर क्लिनिक आणि अपोलो स्पेक्ट्रा हॉस्पिटलच्या डर्माटॉलॉजिस्ट आणि कॉस्मोटोलॉजिस्ट, डॉ. शरीफा चाऊस यांनी सांगितले की, कलिंगड, पुदिना आणि नारळ पाणी एकत्रित करून तयार केलेले डिटॉक्स ड्रिंक आपल्या त्वचेला अनेक फायदे देते.डॉ. शरीफा चाऊस यांनी कलिंगड, लिंबू आणि पुदिनामुळे आपल्या त्वचेसाठी होणारे फायदे सांगितले आहेत.कलिंगड व्हिटॅमिन ए आणि सी समृद्ध कलिंगडमध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असते, जे त्वचा मुलायम, हायड्रेटेड ठेवण्यास मदत करते आणि आपल्या त्वचेच्या कोलेजन उत्पादनासदेखील प्रोत्साहन देते. कोलेजन हे शरीरात आढळणारे सर्वात मुबलक प्रथिने म्हणून ओळखले जाते. ते त्वचेची याग्य निगा राखण्यात महत्वाची भूमिका बजावते लिंबू लिंबामध्ये भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन सी असते, जे कोलेजन उत्पादनास चालना देण्यासह आपल्या त्वचेला उजळण्यास आणि डाग कमी करण्यास मदत करते.पुदिना पुदिन्यामध्ये अँटिऑक्सिडेंट आणि दाहकविरोधी गुणधर्म असतात, जे त्वचेला येणारी सूज कमी करतात आणि दाह शांत करण्यास मदत करतात. पुदिन्याचा सुगंध तणाव कमी करण्याशी संबंधित आहे, जो अप्रत्यक्षपणे आपल्या त्वचेला ताण–संबंधित समस्या दूर करून मदत करतो.सब्जा जेव्हा तुम्ही सब्जा बियांचे पाणी पिता तेव्हा ते तुमच्या शरीराला थंड होण्यास मदत करते, तुम्हाला आम्लपित्त किंवा जास्त उष्णता असल्यास हा एक चांगला पर्याय आहे. हे दैनंदिन हायड्रेशनमध्येदेखील योगदान देते. फायबर, लोह आणि प्रथिने यांसारख्या अत्यावश्यक पोषक तत्वांनी युक्त बिया सकाळी पाण्यासोत घेऊ शकता किंवा दलिया, शरबत, हर्बल टी, स्मूदी, दही किंवा तुमच्या सॅलेडमध्ये घालू शकता , असे दिल्लीच्या 'एनयुटीआर' च्या क्लिनिकल आहारतज्ज्ञ आणि संस्थापक, लक्षिता जैन यांनी द इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना सांगितले.

## लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सीमाभागात करण्यात आलेल्या उपाययोजनांचा संयुक्त आढावा



लातूर : – लोकसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमानुसार लातूर मतदारसंघात आदर्श आचारसंहिता लागू झाली असून आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी जिल्ह्यात विविध पथके स्थापन करण्यात आली आहेत. यासोबतच लातूर जिल्ह्याच्या सीमेला लागून असलेल्या कर्नाटक राज्यातील बिदर जिल्हा प्रशासनासोबत संयुक्तपणे कार्यवाही करून सीमाभागात निवडणूक काळात होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी उपाययोजना केल्या जाणार आहेत. या अनुषंगाने आढावा घेण्यासाठी आज दोन्ही जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक झाली. नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक शशिकांत महावरकर यांची या बैठकीला दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थिती होती. लातूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक केशव राऊत, जिल्हा परिषदेचे मुख्य वित्त व लेखा अधिकारी रमेश चाटे यांच्यासह उदगीर, निलंगाचे उपविभागीय महसूल अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार, पोलीस निरीक्षक आणि बिदर जिल्ह्यातील पोलीस विभागाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे बिदरचे जिल्हादंडाधिकारी गोविंद रेड्डी, पोलीस अधीक्षक चेन्नाबसवन्ना लंगोटी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी सहभागी झाले होते. लातूर आणि बिदर जिल्ह्याच्या सीमाभागात चेकपोस्ट आणि इतर अनुषंगिक बाबींसाठी परस्पर समन्वय ठेवून काम केल्यास मनुष्यबळाचा प्रभावी वापर करणे शक्य होईल. तसेच परस्पर सहकार्याने इतर कार्यवाही अधिक गतीने करता येईल, असे विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. महावरकर यांनी सांगितले. या अनुषंगाने त्यांनी मार्गदर्शन केले. लातूर लोकसभा मतदारसंघ आणि लगतच्या कर्नाटक राज्यातील बिदर जिल्ह्यात तिसऱ्या टप्प्यात मतदान होणार आहे. दोन्ही जिल्ह्यात निवडणूक काळात गैरप्रकार होवू नयेत, निवडणूक प्रक्रिया शांततामय वातावरणात पार पाडण्यासाठी सीमाभागात दोन्ही जिल्हा प्रशासनामार्फत संयुक्तपणे उपाययोजान करणे आवश्यक आहे. लातूर जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरु केल्या आहेत. सीमाभागात या उपाययोजना राबविण्यासाठी दोन्ही जिल्ह्यातील प्रशासनाने एकत्रितपणे कार्यवाही केल्यास अधिक परिणामकारक ठरेल, असे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यावेळी म्हणाल्या. कर्नाटकराज्यातझालेल्याविधानसभा निवडणूक काळात बिदर जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी लातूर जिल्हा प्रशासनाने मोलाचे सहकार्य केले होते. आता लोकसभा निवडणुकीत दोन्ही जिल्ह्यात एकाच वेळी तिसऱ्या टप्प्यात मतदान होणार असल्याने दोन्ही जिल्ह्यातील प्रशासनाच्या समन्वयातून निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी बिदर जिल्हा प्रशासनामार्फत सर्वोतपरी सहकार्य केले जाईल, असे बिदरचे जिल्हादंडाधिकारी गोविंद रेड्डी यांनी सांगितले. तसेच बिदर जिल्हा प्रशासनाच्यावतीने सीमाभागात करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती त्यांनी दिली. आगामी काळात सीमाभागात संयुक्तपणे प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यासाठी बिदर पोलीस दलाची मदत घेतली जाईल. त्यामुळे दोन्ही जिल्ह्यातील सीमाभागातील अवैध कृत्यांना प्रतिबंध करणे शक्य होईल, असे लातूरचे पोलीस अधीक्षक श्री. मुंडे म्हणाले. लातूरचे उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. कदम आणि अपर पोलीस अधीक्षक श्री. देवरे यांनी लातूर जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासनामार्फत सीमाभागात करण्यात आलेल्या उपाययोजना, तसेच या अनुषंगाने बिदर जिल्हा प्रशासन, पोलीस यांच्याकडून अपेक्षित सहकार्य याबाबत माहिती दिली.

## उन्हाळ्यात दररोज कैरी खाल्ल्यास तुमच्या शरीरावर काय परिणाम होतो? वाचा, डॉक्टर काय सांगतात

जसजसा उन्हाळा जवळ येतो तसतसे उन्हाळ्यातील सर्वाची आवडती कैरी बाजारात दिसू लागते. आंबट गोड कैरीला तिखट–मीठ लावून खाण्याची मज्जा वेगळीच असते. उन्हाळा सुरू होताच अनेक घरांमध्ये सर्रासपणे कैरीचे सेवन केले जाते. कधी कच्ची कैरी खातात, कधी कैरीचे पन्हे केले जाते, कधी कैरीचे लोणचे केले जाते. आपण रोज कैरी खाल्ल्यास आपल्या शरीरावर काय परिणाम होतो हे तुम्हाला माहिती आहे का? याच प्रश्नाचे उत्तर आपण तज्ज्ञांकडून जाणून घेऊ या.याबाबत द इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना हैदराबाद येथील यशोदा हॉस्पिटल्सचे कन्सलटंट जनरल फिजिशियन आणि डायबेटोलॉजिस्ट असलेले डॉ. रंगा संतोष कुमार यांनी सांगितले की, अँटिऑक्सिडंट म्हणून कैरी मोठ्या प्रमाणात गॅस्ट्रोप्रोटेक्टिव्ह आहे. गॅस्ट्रोप्रोटेक्टिव्ह म्हणजे जठरासंबंधी श्लेष्मल त्वचेचे नुकसान होण्यापासून पोटाचे संरक्षण करण्यासाठी कार्य करणारी यंत्रणा.कैरी खाल्ल्याने आरोग्याच्या विविध पैलूंवर सकारात्मक परिणाम होऊ शकतो, याचे श्रेय कैरीत असलेल्या भरपूर पौष्टिक घटकांना दिले जाते. कैरीमध्ये आढळणारे मँगिफेरिन, एक शक्तिशाली अँटिऑक्सिडेंट आहे जे यकृताच्या आरोग्यासाठी संभाव्य फायदे देणारे हेपेटोप्रोटेक्टिव्ह गुणधर्म दर्शवते, असे डॉ. कुमार यांनी सांगितले.कैरीमध्ये व्हिटॅमिन सीचे मुबलक प्रमाण असते, जे हेमोफिलिया आणि निमिया सारख्या रक्त विकारांचा धोका कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. याव्यतिरिक्त ते रक्ताच्या गुठळ्या तयार होण्यास प्रतिबंध करते, रक्तवाहिन्यांची लवचिकता वाढवते आणि हिमॅटोपोईसिस प्रक्रियेस समर्थन देते, असे डॉ. कुमार यांनी स्पष्ट केले. हिमॅटोपोईसिस म्हणजे रक्तपेशी घटकांची निर्मिती करणे.डॉ. कुमार यांच्या मते, कैरीमध्ये कॅरोटीनोइड्सचे उच्च प्रमाण असते, जे डोळ्यांचे आरोग्य आणि दृष्टी सुधारण्यास योगदान देऊ शकते. शिवाय, कैरीमध्ये असलेली पाण्याची पातळी शरीरातील निर्जलीकरण रोखण्यासाठी प्रभावी ठरते, विशेषत: उन्हाळ्याच्या महिन्यांत. कैरीच्या पौष्टिक रचनेमुळे हिरड्यांमधून रक्तस्त्राव होणे आणि स्कर्व्हीसारख्या समस्यांचे निराकरण करण्याची तिची क्षमता आहे. स्कर्वी हा एक आजार आहे, जो तुमच्या आहारात व्हिटॅमिन सी (एस्कॉर्बिक सिड) ची तीव्र कमतरता असल्यास होतो.हे रसाळ फळ बद्धकोष्ठता आणि अपचन यांसह साामान्य गॅस्ट्रोइंटेस्टाइनल आजारांवर नैसर्गिक उपाय म्हणून काम करतात; कारण त्यात फायबर घटक आणि पाचक गुणधर्म असतात, असेही डॉ. कुमार यांनी सांगितले.कैरी तुमच्या आतड्यासाठी चांगली आहे का?व्हिटॅमिन ई, व्हिटॅमिन सी आणि अँटिऑक्सिडंट्सच्या मिश्रणासह कैरी उत्कृष्ट प्रतिकारशक्ती वाढवणारा घटक म्हणून काम करते. हे घटक शरीराच्या संरक्षण यंत्रणेला समर्थन देण्यासाठी समन्वयाने कार्य करतात. तुमच्या आहारात कैरीचा समावेश केल्याने अनेक प्रकारचे आरोग्य फायदे मिळू शकतात. एकूणच आरोग्याला चालना मिळते आणि विविध शारीरिक कार्यांना समर्थन मिळते, असे डॉ. कुमार यांनी स्पष्ट केले.काय लक्षात ठेवावे?डॉ. कुमार यांनी सांगितले की, कैरीमध्ये व्हिटॅमिन सी आणि पेक्टिनचे प्रमाण जास्त असते, जे तुमच्या रोगप्रतिकारक शक्ती आणि पचनासाठी फायदेशीर ठरू शकते. पण, कैरीमध्ये उरुशिओल नावाचा पदार्थदेखील असतो, ज्यामुळे तोंड, घसा आणि पचनसंस्थेमध्ये दाह निर्माण होऊ शकते, विशेषत: मोठ्या प्रमाणात सेवन केल्यावर.याशिवाय, कैरीमध्ये सायट्रिक सिडची उच्च पातळी असते त्यामुळे त्याचे जास्त प्रमाणात खाल्ल्यास पोटात जळजळ आणि पोटाच्या समस्या उद्भवू शकतात.

## ऊसाच्या रसामुळे मधुमेहाचा आजार दूर होतो का? तज्ज्ञांनी दूर केले गैरसमज; वाचा, ऊसाचे अनेक फायदे



उन्हाळा आला की आपण आवडीने ऊसाचा ताजा आणि थंडगार रस पितो. ऊसाच्या रसाचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. ऊसाच्या गोडपणाशिवाय आपण त्याच्या फायद्यांकडे लक्ष देत नाही. निरोगी जीवनशैलीसाठी ऊस हा एक उत्तम पर्याय आहे. ऊस हा फक्त उष्णतेपासून संरक्षण करत नाही, तर आजारापासूनही आपल्याला दूर ठेवतो. ऊसाच्या रसापासून आपल्याला भरपूर ऊर्जा मिळते आणि आपली रोगप्रतिकारक शक्तीसुद्धा वाढते. उजाला सिग्नस ग्रुप ऑफ हॉस्पिटल्सच्या आहारतज्ज्ञ एकता सिंघवाल यांनी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना ऊसाचे आरोग्यदायी फायदे सांगत या विषयी सविस्तर माहिती सांगितली आहे.१०० ग्रॅम ऊसामध्ये खालील पौष्टिक घटक असतात. कॅलरी – ४३ कॅलरीज कर्बोदके – ११.८ ग्रॅम फायबर – ०.५ ग्रॅम साखर – ८.९७ ग्रॅम प्रोटिन – ०.२७ ग्रॅम फॅट – ०.२३ ग्रॅम व्हिटॅमिन सी कॅल्शियम लोह मॅग्नेशियम पोटॅशियम आहारतज्ज्ञ एकता सिंघवाल यांनी ऊसाचे फायदे सांगितले आहे. शरीराला भरपूर पाणी मिळते – ऊस हा पाण्याचा उत्तम आणि ताजा स्त्रोत आहे. ऊसाच्या सेवनामुळे आपल्या शरीरात पाण्याची कमतरता भासत नाही.पचनक्रिया सुरळीत राहते – ऊसामध्ये फायबरचे प्रमाण अधिक असते, जे पचनास मदत करते आणि पचनक्रियेशी संबंधित समस्यांपासून आराम मिळतो. ऊर्जा मिळते– ऊसातील नैसर्गिक साखर ऊर्जा वाढवण्यास मदत करते.इलेक्ट्रोलाइट संतुलित ठेवते – ऊसामध्ये पोटॅशियमसारखे खनिजे असतात, जे इलेक्ट्रोलाइट संतुलित ठेवण्यास मदत करतात. अँटिऑक्सिडंट्स – ऊसामध्ये अँटिऑक्सिडंट असतात, जे शरीरातील ऑक्सिडेटिव्ह तणाव कमी करतात.मधुमेहाच्या रुग्णांनी ऊसाचे सेवन करावे का? ऊसामध्ये नैसर्गिक साखर असते, त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांनी कमी प्रमाणात ऊसाचे सेवन करावे. सिंघवाल सांगतात, नियमित रक्तातील साखरेचे प्रमाण तपासणे गरजेचे आहे.गर्भवती महिलांनी ऊसाच्या रसाचे सेवन करावे का?सिंघवाल सांगतात, गर्भवती स्त्रिया कमी प्रमाणात ऊसाचा रस पिऊ शकतात. कारण ऊसाच्या रसामुळे शरीराला भरपूर प्रमाणात पाणी आणि ऊर्जा मिळते.ऊसाचे सेवन करण्यापूर्वी काही गोष्टी लक्षात ठेवा. लर्जी – काही लोकांना ऊसाची लर्जी असू शकते.साखरेचे प्रमाण – ऊसामध्ये नैसर्गिक साखरेचे प्रमाण अधिक असते, त्यामुळे रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांनी ऊसाचे सेवन करण्यापूर्वी विचार करावा.अतिसेवन – ऊसाचे अतिसेवन केल्याने कॅलरीजचे प्रमाण वाढू शकते आणि त्यामुळे वजन वाढू शकते. त्यामुळे अतिप्रमाणात ऊसाचे सेवन करू नये.ऊसासंदर्भात काही गैरसमज आहे. त्याविषयी आज आपण जाणून घेऊ या.१. ऊसाच्या रसामुळे मधुमेहाचा आजार दूर होतो.सिंघवाल सांगतात, ऊस हा संतुलित आहाराचा भाग आहे, पण ऊसाचा रस पूर्णपणे मधुमेह बरा करू शकत नाही.२. ऊसामुळे कर्करोग टाळता येतो आणि कर्करोगाचा आजार दूर होतो.सिंघवाल सांगतात, ऊसातील अँटीऑक्सिडंट्स आरोग्यासाठी फायदेशीर असतात, पण यामुळे कर्करोगाचा आजार बरा होत नाही.

# ती दोन बालके ठरली नशीबवान; पहिला वाढदिवस चार वर्षांनंतर




किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) किनवट तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये मिळून २९ फेब्रुवारी रोजी केवळ दोन बालकांचा जन्म झाला आहे. ही दोन्ही बालके नशीबवान ठरली असून, चार वर्षातून एक वेळा त्यांचा वाढदिवस साजरा केला जाणार आहे. हे वर्ष लिप ईयर म्हणून ओळखले जाते. तालुक्यामध्ये किनवट येथे उपजिल्हा रुग्णालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत ठिकठिकाणी आरोग्यसेवा दिली जाते. ग्रामीण भागातून प्रसूतीसाठी शासकीय रुग्णालयांमध्ये गरोदर मातांना दाखल केले जाते. २९ फेब्रुवारी रोजी किती मातांची प्रसूती झाली, याविषयी माहिती घेतली असता, उपजिल्हा रुग्णालयात या दिवशी दोन प्रसूती झाल्या असून, या दोन्ही बालकांचा वाढदिवस आता चार वर्षांतून एक वेळा येणार आहे. या वर्षी फेब्रुवारी महिन्यात २९ दिवस होते. प्रत्येक चार वर्षांनी २९ दिवसांचा हा महिना असतो. त्यामुळे उपजिल्हा रुग्णालयामध्ये जन्म झालेल्या या दोन्ही बालकांना त्यांचे वाढदिवस चार वर्षांतून एक वेळा साजरे करावे लागणार असून, त्यांचे जन्म संस्मरणीय ठरणार आहेत. दोन्ही प्रसुती नॉर्मल किनवट येथील उपजिल्हा रुग्णालयात २९ फेब्रुवारी रोजी दोन्ही प्रसूती नॉर्मल झाल्या. माता आणि बाळांची प्रकृती ठणठणीत असल्याचे रुग्णालय प्रशासनाने सांगितले. इतर आरोग्य केंद्रांमध्ये मात्र एकही प्रसूती झाली नाही. २९ फेब्रुवारी चार वर्षातून एकदा प्रत्येक तीन वर्षांनंतर येणारे चौथे वर्ष हे लिप ईयर म्हणून ओळखले जाते. सर्वसाधारणपणे फेब्रुवारी महिन्यात २८ दिवस असतात. मात्र लिप ईयरमध्ये फेब्रुवारी महिन्यात २९ दिवस असतात. या वर्षी २९ दिवसांचा फेब्रुवारी महिना होता. या दिवशी ज्या बालकांचा जन्म झाला, त्यांचे वाढदिवस चार वर्षातून एकवेळा येणार आहे, हे विशेष. तालुक्यात २९ फेब्रुवारीला ०२ बाळांचा जन्म तालुक्यात २९ फेब्रुवारी रोजी दोन बालकांचा जन्म झाला. त्यामध्ये एक मुलगा आणि एका मुलीचा समावेश आहे. लिप ईवरमध्ये २९ फेब्रुवारी रोजी जन्माला आलेली ही दोन्ही बालके नशीबवान ठरली आहेत. विशेष म्हणजे, दोन्ही बालकांचे जन्म सर्वसाधारण प्रसूतीने (नॉर्मल) झाले आहेत. तालुक्यात खासगी रुग्णालयांमध्ये या दिवशी किती बाळांचा जन्म झाला, याची माहिती मिळू शकली नाही. रेफरमुळे घटल्या प्रसुती तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये प्रसूतीची सुविधा आहे, परंतु अनेक वेळा मातांना प्रसूतीसाठी रेफर केले जाते. त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रसूतींची संख्या घटली आहे.

## किनवट येथे पुन्हा अवकाळी पावसासह गारांचा मारा



किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) किनवट व परिसरात आज (मंगळवार) दुपारी पुन्हा पाऊस आणि गारा बरसल्या. वातावरणातील बदलाचा १६ मार्च पासून शेतकऱ्यांना सतत फटका बसून हाती आलेल्या गहू, ज्वारी, तूर आणि आंब्याला बसत आहे. हवा, पाऊस आणि गारांचा तडाखा बसल्याने हाती येणारे पिक वाया गेले आहे. मराठवाडा ते कर्नाटकापर्यंत कमी दाबाचा पट्टा तयार झाल्याचा हा परिणाम असल्याचे जानकारांचे मत आहे. महसूल प्रशासन याचे पंचनामे करुन राज्य सरकार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणार काय? याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागून आहे. रब्बी हंगाम आणि उन्हाळी हंगामातील पिकांना अशा अवकाळी वातावरणातील बदलाचा पाऊस आणि गारांचा शेतकऱ्यांना फटका बसत आहे. आज (१९ मार्च) दुपारी साडेबाराच्या सुमारास पावसाला सुरुवात झाली. तब्बल अर्धातास किनवट व परिसराला झोडपले. यात काय नुकसान झाले याची माहिती उपलब्ध होऊ शकली नसलीतरी हाती आलेल्या शेतीमालाचे कांही प्रमाणात नुकसान झाले हे वास्तव आहे.

# प्रतिकूल परिस्थितीवर मात करत श्रद्धाची कनिष्ठ सहाय्यक पदी निवड



जालना : मनात जिद्द आणि ध्येय ठेवले तर कितीही उंच शिखर असो ते सहजपणे गाठता येते. आज अशी परिस्थिती आहे की, खूप कमी मुला-मुलीमध्ये पाहावयास मिळत आहे किंवा ऐकावयास मिळत आहे. जालना येथील श्रद्धा संजय कांबळे राहणार लक्ष्मी नगर, मंठा रोड, हिने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत बुलढाणा येथे कनिष्ठ सहायक पदी वर्नी लागली. मेहनत, जिद्द चिकाटी आणि कठोर परिश्रमाची पराकाष्ठा करत यशाचे शिखर गाठले. तिच्या या यशाचे संपूर्ण परिवारामध्ये आनंदमय वातावरण निर्माण झाले आहे. मुळगाव तोरंबा, तालुका लोहारा जिल्हा उस्मानाबाद आसून जालना येथे सध्या व्यवसायानिमित्त स्थायीक आहेत. आई-वडिलांचे उच्च शिक्षण झाले नसले तरी आपल्या मुलांना आपण शिकविले पाहिजे शिक्षण दिल्याशिवाय पर्याय नाही,अशी गाठ उराशी बाळगून मुलांना उच्च दर्जाचे शिक्षण देत उत्तम संस्काराचे धडे दिले. एकंदरीत एक मुलगा व एक मुलगी असा छोटासा परिवार आहे. वडील पेट्रोल पंपावर काम करतात तर आई घरकाम करते. माझ्या आई-वडिलांनी मला चांगले व उच्च दर्जाचे शिक्षण दिले त्यासोबत संस्काराचेही तडे दिले म्हणून मला शिक्षण घेता आले माझ्या घरची प्रतिकूल परिस्थितीची जाणीव होती त्याच जिद्दीने मला काहीतरी बनायचं आहे, मी अधिकारी होणार, या ध्येयाने मी अनेक परीक्षा दिल्या पण त्यात मला काही फारसे यश प्राप्त झाले नाही. पण मी निराश व हाताशी झाले नाही, तर पुन्हा प्रयत्न करून चिकाटीने अभ्यास करून अनेक प्रतिकूल परिस्थितीवर मात करत अखेर यश प्राप्त केलेच. या यशाचे मानकरी माझे आई-वडील आहेत मी अशी समजते अशी सुखद भावना दैनिक मराठी वार्ताशी बोलताना केले. बुलढाणा जिल्हा परिषद अंतर्गत अनेक महत्त्वाच्या रिक्त जागा होत्या पण त्यातही महिलासाठी एकच जागा असल्याने मला खूप अभ्यास करावा लागला आणि मेहनत घ्यावी लागली. आणि या मेहनतीमुळेच तिने कनिष्ठ सहाय्यक परीक्षेत उत्तम गुण घेऊन यश प्राप्त केले. तिच्या या यशामुळे सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या यशाबद्दल श्रद्धा कांबळे हिला दैनिक मराठी वार्ता परिवाराकडून पुढील वाटचालीस खूप खूप हार्दिक हार्दिक शुभेच्छा..

# जातीवर आधारित रॅलींवर बंदी येणार? अलाहाबाद हायकोर्टाची भाजप, काँग्रेसला नोटीस



अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनौ खंडपीठाने जातीनिहाय रॅलींवर कायमस्वरूपी बंदी घालण्याची मागणी करणाऱ्या जुन्या जनहित याचिकेवर नुकतीच सुनावणी केली. या प्रकरणी न्यायालयाने उत्तर प्रदेशातील भारतीय जनता पक्ष (भाजप), काँग्रेस, समाजवादी पार्टी (एसपी) आणि बहुजन समाज पार्टी (बसपा) या चार प्रमुख राजकीय पक्षांना नोटीस बजावून उत्तर मागवले आहे. खंडपीठाने या प्रकरणाच्या पुढील सुनावणीसाठी १० एप्रिल ही तारीख निश्चित केली आहे.मुख्य न्यायाधीश अरुण भन्साळी आणि न्यायमूर्ती जसप्रीत सिंग यांच्या खंडपीठाने स्थानिक वकील मोतीलाल यादव यांनी जनहित याचिकेवर (पीआयएल) हा आदेश दिला. याचिकाकर्त्याने उत्तर प्रदेशमध्ये जातीनिहाय रॅलींवर बंदी घालण्याची मागणी केली होती. ११ जुलै २०१३ रोजी या प्रकरणाची सुनावणी करताना खंडपीठाने राज्यात जातीनिहाय मोर्चे आयोजित करण्यावर अंतरिम बंदी घातली होती. खंडपीठाने आपल्या आदेशात म्हटले होते की, 'जातीवर आधारित रॅलीचे आयोजन करणे समर्थनीय ठरू शकत नाही.' याचिकाकर्त्याचे म्हणणे आहे की, बहुसंख्यांक समुदायाच्या मतदारांना आकर्षित करण्यासाठी राजकीय पक्ष जातीनिहाय रॅलींचे आयोजन करतात. पण हे लोकशाहीच्या विरोधातील कृत्य आहे. अशा रॅलींमुळे देशातील जातीय अल्पसंख्याक लोक स्वत:च्याच देशात द्वितीय श्रेणीचे नागरिक बनले आहेत. स्पष्ट घटनात्मक तरतुदी आणि त्यात अंतर्भूत मूलभूत अधिकार असूनही, मतांच्या राजकीय खेळात त्यांना निराशा आणि फसवणूक झाल्याची भावना आहे.'

## भगवदगीता प्रज्ञाशोध परीक्षेत मोहिनी आवचार प्रथम

परभणी : इस्कॉनच्या कार्याची माहिती तसेच भगवदगीतेचा प्रसार आणि प्रचार करण्याच्या हेतूने भगवदगीता प्रज्ञाशोध परीक्षा श्री शिवाजी महाविद्यालयामध्ये आयोजित केली होती. या परीक्षेत ६७ विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. सदरील परीक्षेत प्रथम मोहिनी किशन आवचार, द्वितीय विशाल पंडितराव माने, तृतीय दिपक फुलझाडे यांनी क्रमांक पटकावला. त्यांना रोख ३ हजार, २ हजार, १ हजार व प्रोत्साहनपर सहा बक्षिसे ग्रंथ भेट देऊन विद्यार्थ्यांचा मान्यवरांनी सन्मान केला. श्री शिवाजी महाविद्यालय मराठी विभाग आणि इस्कॉन शाखा परभणीच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दि.२० रोजी भगवदगीता प्रज्ञाशोध परीक्षा बक्षीस वितरण कार्यक्रमास डॉ. धनंजय पुरी, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशट्टी, समन्वयक डॉ.प्रल्हाद भोपे, माधव घोडके, सचिन राऊत उपस्थित होते.

# ABVP चे वार्षिक स्नेहसंमेलन घेण्यासंदर्भात शिवाजी महाविद्यालयाच्या उपप्राचार्यांना निवेदन



उदगीर :-अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, उदगीर शाखेच्या वतीने शिवाजी महाविद्यालय येथे मा. उपप्राचार्य मांजरे यांना ग्रंथालयात नविन आवृत्तीचे पुस्तके उपलब्ध करावे व वार्षिक स्नेहसंमेलन घेण्यासंदर्भात निवेदन देण्यात आले. महाविद्यालयातील ग्रंथालयात MPSC/UPSC चे जुन्या आवृत्तीचे पुस्तक ठेवण्यात आले असून नविन आवृत्तीचे पुस्तके उपलब्ध करुन देण्यात यावे जेणेकरून विद्यार्थी नविन अभ्यासक्रमाच्या माध्यमातून चांगले गुण प्राप्त करतील. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित केले जाते परंतु अभाविप च्या असे निदर्शनास आले की, या वर्षी आपल्या महाविद्यालयामध्ये वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले नाही. उन्हाळी परीक्षेच्या (द्वितीय सत्र) अगोदर हे संमेलन आयोजित करून २ दिवसात त्याचे पत्रक काढावे किंवा सांस्कृतिक कार्यक्रमासाठी आकरलेले शुल्क विद्यार्थ्यांना परत करावे अन्यथा अखिल भारतीय विद्यार्थी परिषद तीव्र आंदोलन करेल. या आंदोलनाचे आपण व आपले प्रशासन जिम्मेदार असाल अशी मागणी या निवेदना द्वारे करण्यात आली. यावेळी लातूर विभाग संयोजक विशाल स्वामी शहरमंत्री आदिनाथ मिरकले, सहमंत्री सुमित लाल, आदित्य पाटील, पृथ्वीराज बिरादार, सागर पटणे, सुदाम शिंदे, निखिल कसबे, वैभवी देशमुख, संध्या हत्ते सह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिंदेवाडीचा शेतकरी पूत्र गणेश शिंदे झाला डीवायएसपी

धाराशिव : सुभाष कदम जिद्द व चिकाटीच्या जोरावर तसेच आई-वडील व मोठ्या भावाच्या कष्टाची जाणीव ठेवून शिंदेवाडी (केशेगाव) ता. धाराशिव येथील शेतकरी पुत्राने पोलीस उपअधीक्षक पदाला गवसणी घातली आहे. गणेश हणुमंत शिंदे असे या जिद्दी तरूणाचे नाव आहे. कोणताही क्लास न लावता केवळ स्वअध्ययन करून गणेश शिंदे यांनी हे यश मिळविले आहे.शिंदेवाडी हे धाराशिव तालुक्यातील केशेगाव जवळील जेमतेम ५० उंबरा असलेले गाव आहे. शिंदेवाडी-केशेगाव या दोन्ही गावची मिळून ग्रुप ग्रामपंचायत आहे. शिंदेवाडी येथील शेतकरी हणुमंत शिंदे यांना योगेश व गणेश अशी दोन मुले व एक विवाहीत मुलगी आहे. योगेश शिंदे यांनी जेमतेम बारावीचे शिक्षण घेऊन शेती व व्यवसाय सांभाळत आहेत. गणेश शिंदे यांचे प्राथमिक शिक्षण धाराशिव शहरातील नूतन प्राथमिक शाळेत व श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये झाले. आठवी ते दहावीचे शिक्षण छत्रपती संभाजीनगर येथील सरस्वती भूवन प्रशालेत झाले. अकरावी व बारावी संभाजीनगर येथीलच विवेकानंद महाविद्यालयात झाली. अभियांत्रिकीचे शिक्षण नांदेड येथील शासकीय गुरूगोविंदसिंग अभियांत्रिकी महाविद्यालयात झाले.अभियांत्रिकी पूर्ण झाल्यानंतर गणेश शिंदे यांनी अभियंता म्हणून नोकरी केली नाही. शेतकरी पूत्र असल्याने त्यांना प्रशासनात येऊन जनतेची सेवा करण्याची इच्छा असल्याने त्यांनी राज्य लोकसेवा आयोगाची परिक्षा देण्यासाठी पुणे येथे अभ्यास सुरू केला.

# लातूर जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात चिमण्यांसाठी खाद्य, पाण्याची सुविधा



लातूर, दि. २० : जिल्हाधिकारी कार्यालयात चिमण्यांसाठी खाद्य आणि पाण्याची सुविधा करण्यात आली असून यासाठी झाडांवर बांधण्यात आलेल्या कुंड्यांमध्ये जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते पाणी व खाद्य टाकून या उपक्रमाला प्रारंभ झाला. जागतिक चिमणी दिनानिमित्त वन विभागामार्फत हा उपक्रम राबविण्यात आला. निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, रोहयो उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, वनपरिक्षेत्र अधिकारी सचिन रामपुरे, वन परिमंडल अधिकारी निलेश बिराजदार, वनरक्षक महेश पवार, बालाजी पाटील, श्री. भालेराव , बालाजी कांबळे यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कमर्चारी यावेळी उपस्थित होते. चिमण्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असून २० मार्च या जागतिक चिमणी दिनी याबाबत जनजागृती करण्यासाठी वन विभागाने पुढाकार घेतला आहे. याचाच एक भाग म्हणून आज जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात झाडांवर चिमण्यांसाठी खाद्य आणि पाण्याच्या कुंड्या बांधण्यात आल्या. प्रत्येक नागरिकाने चिमण्यांसाठी आपल्या घराच्या गॅलरीमध्ये खाद्य पाण्याच्या कुंड्या ठेवाव्यात. तसेच चिमण्यांसाठी नैसर्गिक अधिवास तयार करण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी यावेळी केले.

# विकासाला विरोध करणाऱ्यांना धुळेकर जागा दाखवतील - माजी आमदार अनिल गोटे यांची टीका

धुळे : - धुळे शहरात गेल्या पन्नास वर्षात एकाही नवीन रस्त्याची निर्मिती झाली नाही. केवळ आहे त्या रस्त्यावर डांबर टाकुन पैसा कमावण्याचे धंदे केले गेले. आपण पांझरा नदीच्या दोन्ही बाजूला प्रत्येकी साडेपाच किलोमीटरचा रस्ता तयार केला. त्याचप्रमाणे आता हत्ती डोह ते पारोळा रोड जोडणारा नवीन रस्ता तयार करण्याचे काम सुरू केले. पण केंद्राने मंजूर केलेल्या रस्त्याला राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा गट धुळ्यातील विकास कामाला विरोध करतो आहे. पण धुळेकर जनता योग्य वेळ आल्यानंतर त्यांना फटके दिल्याशिवाय राहणार नाही, असे आव्हान माजी आमदार अनिल गोटे यांनी आज पत्रकार परिषदेत दिले.धुळे येथील कल्याण भवनात झालेल्या पत्रकार परिषदेत प्रसंगी लोकसंग्रामचे तेजस गोटे, दिलीप साळुंखे यांच्यासह अन्य मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना माजी आमदार अनिल गोटे यांनी विकासाला विरोध करणाऱ्या प्रवृत्तीवर कठोर शब्दात टीका केली आहे. शहरातील पांझरा नदी हत्ती डोह ते पारोळा रोडवरील शेतकरी पुतळया पर्यंत जाणारा नवीन डी पी रस्ता तयार करण्याचे काम रोखण्यासाठी राष्ट्रवादीचे अजित पवार गटाने ओसाड गावचा जहागिदाराला पुढे करुन अडथळा करण्याचे उदयोग चालवले असल्याचा आरोप माजी आ. अनिल गोटे यांनी केला.ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीतून रस्ता जातो, त्यांचे ना हरकत पत्र दिनांक ७ सप्टेंबर २०२० रोजीच आंम्हाला तत्कालीन आयुक्तांनी दिले आहे. कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी या प्रश्नावर दोन वेळा स्वतःच्या अध्यक्षतेखाली बैठक घेतली. अखेरीस मान्यता दिली. धुळे जिल्हा बांधकाम विभागाने डी. पी. प्लॅन प्रमाणे रस्त्याचे इस्टीमेट तयार केले. अधीक्षक अभियंतांनी नाशिक येथे मुख्य अभियंत्यांकडून सचिव बांधकाम यांनी शिफारस करून केंद्र सरकारच्या रस्ते बांधकाम विभागाकडे पाठविले. तेथे सर्व कागदपत्रांची छाननी, तपासणी झाली. नंतर निधी मिळाला. असे असतांना विकास कामात अडथळा आणण्यात येत आहे. तसेच अजित पवारांसह राष्ट्रवादीची वाट लावण्याची सुपारी घेवूनच पुण्याचे तथाकथित कामाला लागले आहेत. धुळे शहराच्या विकासाची काहीही देणे घेणे नसलेल्या या तथाकथित पुढाऱ्याने आता जनतेच्या फायद्यासाठी तयार होणाऱ्या नवीन रस्त्याला विरोध करण्याचा उद्योग सुरू केला आहे. पण कोणत्याही विरोधाला आपण भीक घालत नसून धुळेकर जनतेला सुविधा देण्याचे काम आपण पूर्णत्वास नेणार असल्याचे देखील गोटे यांनी यावेळी सांगितले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE